# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ११
## सभावृत्तांत

दिनांक :- ११/०१/२०१७ वेळ :- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ११/०१/२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी अध्यक्षा
२. मा.शमीम पठाण
३. मा. अॅड.चिंचवडे संदिप गुलाबराव
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा. छाया जगन्नाथ साबळे
६. मा.जगताप विमलताई सुरेश
७. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१०. मा.पवार यमुनाताई रमणनाना
११.मा.शरद माणिकचंद लुणावत स्विकृत सदस्य
१२.मा.गोरक्ष दशरथ पाषाणकर स्विकृत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.मिनिनाथ.दंडवते – क्षेत्रिय अधिकारी,ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव,प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.एकनाथ पाटील --कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय ,मा.संध्या वाघ- उपअभियंता, स्थापत्य विभाग, मा.भाऊसाहेब साबळे – उपअभियंता पाणीपुरवठा विभाग,,मा.आर.पवार- उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक, मा.आर.एन.भाट,मुख्य आरोग्य निरिक्षक, ब क्षेत्रीय कार्यालय, मा.राजू कोतवाल, क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष सौ.आशाताई सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्र.९, दि.९/११/२०१६,तहकुब सभा दि. २८/११/२०१६, दि.५/१२/२०१६, दि.१४/१२/२०१६, दि.१७/१२/२०१६, दि.२२/१२/२०१६ रोजीच्या सभांचे सभावृत्तांत कायम करुन कार्यपत्रिका क्र.१०,दि.१४/१२/२०१६,तहकुब सभा दि.१७/१२/२०१६, दि.२२/१२/२०१६ मधील कार्यपत्रिका क्रमांक १० दिनांक २२/१२/२०१६ रोजीच्या सभेमधील विषय क्रमांक २२ ठराव क्रमांक ७७, मध्ये ब प्रभागांतर्गत झालेल्या विकास कामाचे नामफलक त्या त्या प्रभागातील नगरसेवकांच्या कामाचे बाबतीत असलेली माहिती त्या ठिकाणी लावणे अशी सुचना सदर ठरावात नमुद करुन या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष व मा.सन्मा.सदस्यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक १ प्रभाग क्रमांक २२ या ठिकाणी सिमेंट रस्त्याचे काम पुर्ण होत आलेले आहे. परंतु आनंदवन हौसिंग सोसायटी, शुभम हौसिंग सोसायटी, कुणाल रिव्हर व्हयूव या ठिकाणच्या नागरीकांना पुलाखालील पार्क केलेल्या वाहनांमुळे सोसायटीमध्ये येण्या जाण्यास अडचणी होत आहेत. त्यामुळे होणारी अडचण दुर होण्यासाठी सदगुरु स्वयंरोजगार सेवा संस्था या संस्थेस सदरचा २०० मीटर क्षेत्रात पे ऍण्ड पार्कसाठी मनपाच्या दरानुसार विचार करणे मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २ मनपाच्या चापेकर चौक येथील शाळेतील हॉल स्नेहदीप महिला बचतगटाच्या महिलांना शनिवार रविवार व सुटटीच्या दिवशी महिलांना मोफत इंग्रजी बोलणे प्रशिक्षणासाठी देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ प्रभाग क्रमांक २० मध्ये आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधून मिळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.शमीम पठाण यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ श्री साई मंदिर बापुजीबुवानगर प्रभाग क्रमांक ४९ व थेरगांव गावठाण पदमजी पेपर मील प्रभाग क्रमांक ५० मध्ये अनुसुचीत जाती वर्गातील लोकसंख्या जवळजवळ ११ हजार असून, सदर समाजातील लोकांना सार्वजनिक कार्यक्रम किंवा इतर कार्यक्रम करण्यासाठी समाज मंदिराची आवश्यकता आहे. मी माझ्या कुटूंबियांनी सामाजिक बांधिलकी म्हणून नदीकाठची जमीन स्मशानभुमी व सार्वजनिक शौचालयासाठी विनामोबदला दिली असून, सदर जागेच्या बदल्यात प्रभाग क्रमांक ५० थेरगांव विरंगुळा केंद्राशेजारी समाज मंदिरासाठी जागा व समाज मंदिर बांधून मिळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ८१
दि. ११/१/२०१७

विषय क्र. १
विभाग – १ भुमि आणि जिंदगी विभाग (मुख्यकार्यालय)
२ ब क्षेत्रिय कार्यालय(प्रशासन विभाग)

सुचक :- मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव

अनुमोदक: मा.यमुनाताई पवार

संदर्भ :- मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि. ११/१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक २२ या ठिकाणी सिमेंट रस्त्याचे काम पुर्ण होत आलेले आहे. परंतु आनंदवन हौसिंग सोसायटी, शुभम हौसिंग सोसायटी, कुणाल रिव्हर व्हयूव या ठिकाणच्या नागरीकांना पुलाखालील पार्क केलेल्या वाहनांमुळे सोसायटीमध्ये येण्या जाण्यास अडचणी होत आहेत. त्यामुळे होणारी अडचण दुर होण्यासाठी सदगुरु स्वयंरोजगार सेवा संस्था या संस्थेस सदरचा २०० मीटर क्षेत्रात पे ऍण्ड पार्कसाठी मनपाच्या दरानुसार ठेकेदारी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव कायम होण्याची वाट न पहाता कार्यवाही करण्यात यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८२ — विषय क्र. २

दि. ११/१/२०१७ — विभाग – भुमि आणि जिंदगी विभाग

सुचक :- मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव — अनुमोदक: मा. शमीम पठाण

संदर्भ :- मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि. ११/१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

मनपाच्या चापेकर चौक येथील शाळेतील हॉल स्नेहदीप महिला बचतगटाच्या महिलांना शनिवार रविवार व सुटटीच्या दिवशी महिलांना मोफत इंग्रजी बोलणे प्रशिक्षणासाठी देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करण्यात यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ८३ — विषय क्र. ३

दि. ११/१/२०१७ — विभाग – १ आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय
२ भुमि आणि जिंदगी विभाग

सुचक :- मा. शमीम पठाण — अनुमोदक: मा. झामाबई बारणे

संदर्भ :- मा. शमीम पठाण यांचा दि. ११/१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रात आरोग्य किटकनाशक विभाग व औष्णिक धुरीकरण विभागाचे कार्यालय हे पिंपरीमध्ये इंदिरा गांधी रेल्वे उडडाण पुलाखाली आहे. सदरचे कार्यालय हे ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रात नाही.

ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक क्र२० मध्ये प्रेमलोक पार्क येथील मनपा दवाखान्यासमोर असलेल्या मोकळया जागेत किटकनाशक विभाग औष्णिक धुरीकरणाचे विभागाचे साहित्य ठेवणेकरीता खोली तसेच संबंधीत विभागाचे आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधणेत यावे जेणेकरुन ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये औषध फवारणी व औष्णिक धुरीकरणाचे कामकाज व्यवस्थित करुन घेणे सोयीचे होईल.

तरी सदर ठिकाणी औषध फवारणी व औष्णिक धुरीकरणाचे वेगवेगळया खोल्या व सदर विभागाचे आरोग्य निरिक्षक कार्यालय बांधणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता कार्यवाही करण्यात यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्र. ८४ — विषय क्र. ४

दि. ११/१/२०१७ — विभाग – ब क्षेत्रिय कार्यालय स्थापत्य विभाग

सुचक :- मा. अप्पा उर्फ संपत पवार — अनुमोदक: मा. झामावई बारणे

संदर्भ :- मा. विमलताई जगताप यांचा दि. ११/१/२०१७ रोजीचा प्रस्ताव

श्री साई मंदिर बापुजीबुवानगर प्रभाग क्रमांक ४९ व थेरगांव गावठाण पदमजी पेपर मील प्रभाग क्रमांक ५० मध्ये अनुसुचीत जाती वर्गातील लोकसंख्या जवळजवळ ११ हजार असून, सदर समाजातील लोकंना सार्वजनिक कार्यक्रम किंवा इतर कार्यक्रम करण्यासाठी समाज मंदिराची आवश्यकता आहे. मी माझ्या कुटूंबियांनी सामाजिक बांधिलकी म्हणून नदीकाठची जमीन स्मशानभुमी व सार्वजनिक शौचालयासाठी विनामोबदला दिली असून, सदर जागेच्या बदल्यात प्रभाग क्रमांक ५० थेरगांव विरंगुळा केंद्राशोजारी समाज मंदिरासाठी जागा व समाज मंदिर बांधून मिळणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ १० /२०१७.
दिनांक : ११ / ०१ /२०१७

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना